दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •


• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २२६ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.२७ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आदित्यना पाडण्यात,ठाकरेंना पदावरून हटवण्यात राऊतांचा हात-सुधीर मुनगंटीवार

## राऊतांना खोटे बोलण्याचे व्यसन

**नागपूर (वृत्तसंस्था)-संजय राऊतांची खोट बोलण्याची सवय व्यवसानात रुपांतरीत झाली आहे. आदित्य ठाकरेंना पाडण्यात आणि उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री पदावरून हटवण्यात राऊतांचाच हात आहे, असा दावा करत भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी ठाकरे गटाचे नेते राऊतांवर जोरदार पलटवार केला.**

मुनगंटीवार म्हणाले की, नितीन गडकरींच्या पाठिशी मोदी, शहा आहेत. म्हणूनच ते विकास करू शकले. संजय राऊतांनी केलेला आरोप निराधार आहे. वर्तमानपत्रात बातमी यावी म्हणून आरोप करतात आरोपांना तथ्य नाही. उद्धवजींना इंडिया आघाडीच्या मोठ्या नेत्यांनी बोलवलं पण उद्धवजींना बाहेर कुणी बोलवले का?, असा सवालही सुधीर मुनगंटीवार यांनी विचारला आहे.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, नितीन गडकरी हे देशात सर्वमान्य नेते आहेत. नितीन गडकरींनी प्रस्ताव मांडल्यावर सर्व खासदारांनी त्यांचे कौतुक केले. नितीन गडकरी यांच्या पाठीशी पंतप्रधान मोदी आहेत. तर संजय राऊतांनी केलेला आरोप पूर्णपणे निराधार आहे. एकदा टीव्हीवर दिसायची सवय लागली. वर्तमानपत्रात रोज फोटो किंवा बातमी यावी, हे व्यसन जडले, तर हे आरोप होत असतात. या आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही असे त्यांनी म्हटले आहे.सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, राज्यातील प्रचारासाठी उद्धव ठाकरेंनी इंडिया आघाडीतील अनेक नेत्यांना बोलावले. मात्र, इंडिया आघाडीतील कोणत्या नेत्याने उद्धव ठाकरेंना देशात प्रचार करण्यासाठी बोलावले का, उद्धव ठाकरेंनी या आयुष्यात मोठी चूक केली आहे. ईश्वरचरणी एवढीच प्रार्थना आहे की, उद्धव ठाकरेंचा पुढचा जन्म होईल, तेव्हा अशी चूक त्यांच्याकडून होऊ नये, असा टोलाही लगावला आहे.भाजप नेते प्रवीण दरेकर म्हणाले की, सामन्याच्या दाव्याला आम्ही काडीमात्र किंमत देत नाही. गडकरी त्यांच्याबाबतीतले वक्तव्य म्हणजे संजय राऊत यांचा मूर्खपणाचा कळस आहे. प्रचारात राज्यभर व्यस्त असतानाही देवेंद्रजींनी आणखी विजय भक्कम व्हावा यासाठी काय योगदान दिलेय हे नागपूरवासियांना माहित आहे. संजय राऊत यांचे दुटप्पी बोलणे आहे. अगोदर बोलायचे विरोधात रसद पुरवली, नंतर बोलायचे प्रचारात उतरले. संजय राऊत नेमके टीका करतानाही काय नेमके हे निश्चित करून घ्या, असे प्रविण दरेकर म्हणाले.



## थोडक्यात

### सराफा व्यापाऱ्या कडे सापडले कोट्यवधीचे घबाड

**नाशिक**-नाशिकमधील एका बड्या सराफा व्यावसायिकाच्या दुकानावर व डेव्हलपर्सच्या कार्यालयात आयकर विभागाने गुरुवारी छापा टाकून सलग ३० तास झाडाझडती घेतली. यात सुमारे २६ कोटी रुपयांची रोकड तसेच ९० कोटींच्या बेहिशेबी मालमत्तेचे दस्तवेज जप्त करण्यात आले. नाशिक, नागपूर, जळगावच्या पथकाने ही कारवाई केली. ५० ते ५५ अधिकाऱ्यांनी सुराणा ज्वेलर्स यांची पेढी तसेच त्यांच्या रिअल इस्टेट व्यवसायाच्या कार्यालयात छापासत्र सुरू केले. त्याचवेळी त्यांच्या राका कॉलनीतील आलिशान बंगल्यात देखील स्वतंत्र पथकाने तपासणी सुरू केली. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी असलेले त्यांचे कार्यालय, खासगी लॉकर्स व बँकांमधील लॉकर्सही तपासण्यात आले. मनमाड व नांदगावमधील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या घरीही तपासणी केली.कापडी पिशव्या, ट्रॅव्हलर्स बॅग, ट्रॉली बॅगमध्ये भरलेली रोकड ७ कारमधून मोजणीसाठी सीबीएसजवळील स्टेट बँकेच्या कार्यालयात आणण्यात आली. शनिवारी रात्री ११.३० वाजता नोटांची मोजणी पूर्ण झाल्यानंतर अन्वेषणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रोकड ताब्यात घेतली. दरम्यान, मागील काही दिवसांपासून कर बुडवे व्यवसायिक हे आयकर विभागाच्या रडारवर होते. त्यानुसार आयकर विभागाचे अधिकारी खासगी वाहनातून नाशिकमध्ये दाखल झाले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी छापेमारी सुरू केली. ज्या ठिकाणी छापेमारी सुरू होती, त्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता.

### राज्यात प्रथमच जळगाव अन् अकोल्यात जमावबंदी

**पुणे**-राज्यभरात उष्णतेची भीषण लाट आली असून पारा असह्यतेच्या पातळीवर गेल्याने जळगाव जिल्ह्यात २५ मे ते ३ जूनपर्यंत तर अकोला जिल्ह्यात ३१ मेपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आली आहे. राज्यात शनिवारी २२ शहरांतील पारा चाळिशीपार होता. भुसावळला उच्चांकी ४६.२ तापमान नोंदवले गेले. दरम्यान, मुंबईसह उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र तसेच विदर्भ, मराठवाड्यात २६ ते ३० मेपर्यंत उष्णतेची लाट येण्याचा अंदाज पुणे हवामान विभागातील निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तवला आहे. जळगाव, अकोला जिल्ह्यात उष्माघाताचा धोका निर्माण झाल्याने नागरिक, कामगार, विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून कामाच्या व क्लासेसच्या वेळेत बदल करण्याचे सूचित करण्यात आले आहे.राज्यात २० मे रोजी लोकसभा निवडणुकीची मतदान प्रक्रिया संपली. परंतु त्यानंतर उष्णतेच्या लाटेत अवघा महाराष्ट्र होरपळून निघत असताना राज्यभरात अघोषित लोडशेडिंग सुरु झाले आहे. राज्याची वीजमागणी मे महिन्यात ३० हजार मेगावॅटपर्यंत पोहोचण्याचा अंदाज होता. मात्र १२ ते १४ मेच्या दरम्यान राज्यभरात झालेल्या अवकाळी पावसामुळे विजेची मागणी वाढली नाही. भूजलसाठा घटल्याने सध्या शेतीपंपही बंद आहेत. परिणामी एप्रिल महिन्याच्या तुलनेत विजेची मागणी सरासरी दोन हजार मेगावॅटने कमी झाली, असे असतानाही राज्यभरात अघोषित भारनियमन केले जात आहे. राज्यातील तापमानाचा पारा सरासरी ४२ ते ४३ अंशांच्या वर आहे.

### मायाताई निंबाळकर यांचे निधन

**वणी :** स्थानिक विठ्ठलवाडी निवासी मायाताई सदाशिवराव निंबाळकर यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ७६ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,मुलगी, नातवंडे आणि आप्त परिवार आहे.



# दारू विक्री संदर्भात अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे दारू दुकानदार व बारमालकांना सक्त निर्देश



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पुणे येथे घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यात दारू विक्री व परवानाबाबत जिल्हा प्रशासन क्शन मोडवर आले असून दारू विक्री संदर्भात सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा सक्त कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दुकानदार व बारमालकांना दिला आहे. एफएल -३ अनुज्ञप्तीधारकांनी कुठल्याही संबंधित किरकोळ मद्य विक्री अबकारी अनुज्ञप्तीतून २१ वर्षाखालील व्यक्तीस मद्य विक्री करू नये. तसेच २१ ते २५ वर्ष वयोगटात असलेल्या व्यक्तीस सौम्य बियर /सौम्य मद्य विक्री करावी. २५ वर्षपेक्षा कमी वयोगटात असलेल्या व्यक्तीस तीव्र मद्य देऊ नये.अनुज्ञप्तीच्या वेळेचे काटेकोरपणे पालन करावे. चंद्रपूर जिल्ह्यातील अनुज्ञप्ती सकाळी ११.३० ते रात्री ११.३० या वेळेतच सुरू राहील, याची दक्षता घ्यावी.मद्य सेवन करणाऱ्या व्यक्ती जवळ मद्य सेवनाचा परवाना असणे आवश्यक आहे. अनुज्ञप्तीच्या जागेत कोणत्याही असमाजिक तत्व / गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती आढळल्यास त्याबाबत त्वरित पोलीस विभागाला कळवावे. अनुज्ञप्तीच्या परिसरात येणाऱ्या व जाणाऱ्या ग्राहकांच्या हालचालीवर नजर ठेवण्याकरिता सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे. मंजूर जागेच्या क्षमतेपेक्षा जास्त व्यक्तींना अनुज्ञप्तीच्या ठिकाणी प्रवेश देऊ नये. परवाना कक्ष अनुज्ञप्ती कामकाजाच्या वेळेबाबतचा फलक आस्थापनेच्या आत दर्शनी भागात लावावा. वरील सर्व बाबींचे अतिशय काटेकोरपणे पालन करावे, अन्यथा सक्त कारवाई करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहे.

# तथागत गौतम बुद्धाची शिकवण विश्व शांतीकरिता मौलिक-हरिदास कापटे



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्थानिक वं. रा. सं. तुकडोजी महाराज योग वर्ग छत्रपती नगर तुकूम येथे बुद्ध पौर्णिमा २३ मे २०२४ ला मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी करण्यात आली. हिंदू धर्मात गौतम बुद्धाला विष्णुचा अवतार मानले जाते. गौतम बुद्धांनी जगाला उदात्त सत्याचा आणि शांतीचा उपदेश केला. हा उपदेश आणि शिकवण आपल्या जीवनात आत्मसात केल्यास आपले आयुष्य सुखमय होऊन बदलू शकते असे विचार मंडळ अध्यक्ष हरिदास कापटे यांनी व्यक्त केले. विश्वाशांतीचा एकमेव मार्ग म्हणजे बुद्धाची शिकवण असल्याचे मत मधुकर राजूरकर यांनी मांडले. सचिव प्रकाश कसर्लेवार, मगरे, रामटेके , निलेश देवतळे, उमेश आत्राम, प्रदीप खांडरे, खोब्रागडे , अश्विन घागरगुंडे, पुंडलिक नींदेकर इत्यादी मान्यवरांनी गौतम बुद्धाच्या जीवन पटावर प्रकाश टाकीत सत्य, अहिंसा, शांती, मानवता आणि सामानतेची शिकवण ही सर्व धार्म्यिांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत विषद केले.

यावेळी सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन करण्यात आले व विविध भजने सादर करण्यात आली.याप्रसंगी रेखा कापटे, नवघरे, हनुमंते, घागरगुंडे, देवतळे, गीतांजली रामटेके, खांडरे, संगीता उपरे, वेलपुलवार, सुषमा खोब्रागडे, जुमडे, वादलकोडावर, हलमारे, कांबळे, हेमलता पोहणकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्र संचालन हरिदास कापटे तर आभार आणि समारोप उमेश आत्राम यांनी केले.

# सावरगाव-गिरगांव बायपास मार्गावरील डांबर उडाले;जागोजागी रस्त्यावर खड्डे

## या रस्त्यावर झाला आहे अंडरगावून बोगदा


सावरगाव- गिरगांव या बायपास मार्गांवरून गोसेखुर्द कालवा गेलेला असल्याने या रस्त्याच्या मधोमध अंडरगाऊन बोगदा तयार करण्यात आला आहे.त्या ठिकाणी चार गावच्या रस्त्याचे संगम आहे.बऱ्याच पैकी बोगद्याचे बांधकाम पूर्ण झाले असून बोगद्यातून मार्गक्रमन करणे सुद्धा सुरू झाले आहे.मात्र आजूबाजूचे सारे रस्ते अर्धवट बांधकाम झालेले आहे.तर सावरगाव - गिरगांव या रस्त्यावरीलह बोगद्याप्रयन्तचा मार्ग पूर्णतः गिट्टी उखळून खितपत पडला आहे.या रस्त्यावरील डांबरीकरणाचा मुहूर्त कधी निघेल ?हे कळण्याला मार्ग नाही.

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सावरगाव - नवरगाव मार्गावरील अगदी जवळचा असलेल्या सावरगाव- गिरगाव हया बायपास डांबरी रस्त्यावरील डांबर पूर्णतः नाहीसा झाला असून जागोजागी खड्डे पडलेले आहे.आणि रस्त्यावरील गिट्टी पूर्णतः उखळून पडली आहे. या रस्त्याने वाहन चालविताना खूपच सावधगिरी बाळगावी लागते.ही एक तारेवरची कसरतच असून या रस्त्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने कित्येक दिवसांपासून या रस्त्याची समस्या आहे त्याच अवस्थेत आहे.सावरगाव वरून नवरगावला जाण्यासाठी व्हाया चिखलगाव मार्गे असे घुमून जावे लागते. मात्र मात्र सावरगाव येथून एच.पी.पेट्रोलियम पुढील पूर्वेकडील सावरगाव व्हाया गिरगांव ते नवरगाव हा मार्ग अत्यन्त जवळचा मार्ग आहे. मात्र हा मार्ग कित्येक दिवसांपासून पूर्णतः उखळलेला आहे.आणि जागोजागी खड्डे पडलेले आहे. किंबहुना या मार्गांवरील डांबर तर केव्हाचेच नष्ट झालेले आहे.उरली आहे या रस्त्यावर केवळ गिट्टी. अशा अवस्थेतही केवळ अंतर कमी पडतो म्हणून बहुतांश वाहन धारक ह्याच मार्गाने ये - जा करने पसंत करतात.मात्र येथून मार्गक्रमण करताना वाहनाची व स्वतःची तेवढीच काळजी घ्यावी लागते.नाहीतर किरकोळ अपघात व्हायला वेळ लागत नाही. शिवाय किरकोळ अपघात झाले सुद्धा आहेत.अशा कमी अंतराच्या सावरगाव-गिरगांव या बायपास रस्त्याकडे बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधी यांचे लक्ष का जात नाही? याबाबत नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केला आहे.दरम्यान या रस्त्यावर सुद्धा डांबरीकरण करून हा मार्ग सुरळीत करावा.अशी नागरिकांची मागणी आहे.

# 'सुरजागड' प्रकल्पाचे बचाव पथक ठरत आहे अपघातग्रस्तांसाठी 'देवदूत'







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी मार्ग असो की गडचिरोली जिल्ह्यातील इतर मार्ग.सुरजागड प्रकल्पाच्या प्रभावित क्षेत्रात विविध कारणांमुळे घडणाऱ्या अपघाताच्या घटनेनंतर याच प्रकल्पाचा 'हात' मदतगार ठरू लागला आहे.याची प्रचिती अनेक प्रसंगांतून अनुभवता आली.काही दिवसापूर्वी आष्टी-चंद्रपूर रोडवरील विठ्ठलवाडा गावाजवळ दारूच्या नशेत अतिवेगाने दोन मोटरसायकलस्वारांची समोरासमोर धडक झाली.यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला.दरम्यान लोहखनिज प्रकल्पाच्या बचाव पथकाने तत्काळ पोलिसांना माहिती दिली.जखमी व्यक्तीला गोंडपिपरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले.यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी चंद्रपूरला पाठविले.अशीच घटना लगतच्या आष्टी परिसरात घडली.तिथे एका लग्न समारंभासाठी आलेले तिघेजण दारूच्या नशेत मोटारसायकलवरून चामोर्शीकडे जात होते.त्यांच्या मोटारसायकलचा वेग अधिक राहिल्यामुळे अनखोडा गावाजवळ त्यांचे नियंत्रण सुटले आणि चामोर्शीकडून येणाऱ्या पोलिसांच्या कॅस्पर वाहनाला त्यांची धडक बसली.यात तिघांचा जागीच मृत्यू झाला.दरम्यान कंपनीच्या बचाव पथकाने घटनेची माहिती आष्टी पोलिसांना दिली.पोलिसांनी तिन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी चामोर्शी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवून परिस्थितीमुळे खोळंबली व्यवस्था पूर्ववत करीत रस्ता मोकळा केला.१२ मे रोजी एमएच ०१ ए एक्स ३८२३ क्रमांकाची वॅगनआर कार केटरिंगचे काम करून चंद्रपूरकडे जात होती.तारसा ते विठ्ठलवाडा दरम्यान पवन धाब्यासमोर ही कार भरधाव वेगात ओव्हरटेक करत असताना सदर वाहनाचा टायर फुटल्याने कारचा तोल ढासळला.त्याचवेळी ही कार एमएच ३३ एबी ०८९२ क्रमांकाच्या मोटारसायकलला धडकली.या घटनेत समोरून येणारा मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला.दरम्यान सुरजागड प्रकल्पाच्या गस्तीपथकाने तात्काळ घटनास्थळ गाठून सुरक्षारक्षक व पर्यवेक्षकांच्या मदतीने पिडीताला गोंडपिपरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेले.तेथून प्राथमिक उपचारानंतर रुग्णाला चंद्रपूर जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.अरविंद भोलानाथ बिस्वास असे या अपघातग्रस्ताचे नाव आहे.याशिवाय कार क्रमांक एमएच १२ डब्लूके ५८१२ आणि मोटारसायकल क्रमांक एमएच ३४ सीके ११७५ परस्परविरुद्ध दिशेने येत होते.कार गोंडपिपरी येथील फॉरेस्ट नाक्यावरून जात होती तर मोटारसायकल करंजी गावातून निघाली.दरम्यान कारचालकाने गोंडपिपरी नाक्याच्या साधारणतः तीनशे मीटर पुढे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनाला ओव्हरटेक केले.यावेळी ओव्हरटेक करतांना मोटारसायकलला धडक बसली. मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला.दरम्यान कंपनीच्या बचाव पथकाने घटनास्थळी पोहोचून पोलिसांना खबर दिली.त्यांनीच जखमींना लगतच्या गोंडपिपरी रुग्णालयात सुध्दा नेले.दुसऱ्या एका घटनेत एक व्यक्ती आष्टीहून गोंडपिपरीकडे मोटारसायकलवरून जात होता.हा दारूच्या नशेत गाडी चालवित राहिला.दरम्यान नवेगाव टोलनाक्याजवळ त्याचा तोल गेला आणि दुभाजकावर गाडी आदळून तो गंभीर जखमी झाला.अशावेळी कंपनीचा बचाव पथक तिथे पोहोचला.त्यांनी पीडिताला गोंडपिपरी ग्रामीण रुग्णालयात हलविले.स्थानिक पोलिसांना माहिती दिल्यानंतर उपचार होऊन आज त्याची प्रकृती स्थिर आहे.हा सुरजागड प्रकल्पाच्या बांधिलकी पालिकडचा विषय असून त्यांच्या जागृकतेमुळे मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.एकंदरीत 'सुरजागड' प्रकल्पाचे बचाव पथक अपघातग्रस्तांसाठी 'देवदूत' ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# संयमाचं डोंगर: माई रमाई!

**काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. अशी प्रेरणादायी संकलित माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक. सदर लेखात देताहेत... संपादक**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या.



**संकलन व सुलेखन**
**श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली,**
**फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.**

कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे



बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे निर्वाण झाले.

!! माता रमाई व त्यांच्या अभूतपूर्व त्यागाला त्रिवार दंडवत प्रणाम जी !!

# तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !



**भिकू धुत्रे यांची मुलगी रमा व सुभेदार रामजी सकपाळ यांचे पुत्र भीमराव यांचा विवाह मुंबईतील भायखळा भाजीमंडीमध्ये झाला. त्यावेळी रमा ९ वर्षाची व भीमराव १४ वर्षाचे असतांना त्यावेळी बालविवाहाची प्रथा समाजात रुढ होती. समाजाने देखील मान्यता दिली होती. विवाह अत्यंत साध्या पध्दतीने पार पडला. रमा लहान असतांनाच आई व वडीलांचे छत्र हरपले होते. तेव्हा रमाच्या कोवळया मनावर आघात झाला. परिस्थिती देखील बेताचीच होती. मामा व काकांनी चार भावंडांचा सांभाळ केला, लग्नाला पुढाकार देखील त्यांनीच घेतला. सागराची अथांगता, सुर्याचे तेज, चंद्राची शितलता, पाण्याची निर्मळता, वृक्षाची सावली, कस्तूरीचा सुगंध आणि अमृताची गोडी म्हणजे रमाई. आई ही व्यक्ति असते, त्यापेक्षाही एक वृत्ती असते. आश्वस्त करणारी शक्ति असते, तिच्यात पुण्यसंचय आणि अध्यात्मकता ठासून भरलेली असते. सोसण्याने माणूस खंगत नाही. खचत नाही आणि कणखर बनतो. आपल्या सहनसीमेचा अंदाज आपल्यालाच नसतो. त्या दु:खाचा आवंढा गिळत होत्या पण कधीच हतबल, हताश, हिरमुसल्या नाहीत. इतक्या सोज्वळ व शांत स्वाभावाच्या रमाई होत्या. इतकी करारी बान्याची माता आजवर बघण्यात आलीच नाही. संवेदनाचा ओलावा हेच नात्याचं बलस्थान असते, हे आपणांस रमाईत आढळते.**

भीम आम्हा शेषितांच्या मायेचा पदर
तू त्या पदराची सोनेरी किनार गं रमाई !
भीम वणवा जुल्मी व्यवस्था जाळणारा
तू त्या वणव्याची ठिणगी गं रमाई
भीम जरी जगी ओळख भारताची
तुझ्या वीणा भीम अधुरा गं रमाई !

अत्यंत हालाकीचे दिवस काढणारी माता रमाईने अनेक निधन जवळून बघितले. प्रत्येक निधनाने ती ही थोडी-थोडी मेल्यागत पण त्या खचल्या नाहीत, बेडर झाल्यात. मरण म्हणजे काय ? कळत नव्हते, त्या बाल वयात आई वडिलांचा मृत्यू. १९१३ साली रामजी सुभेदारांचा मृत्यू, १९१४ ते १९१७ दरम्यान रमेशचा मृत्यू, बाबांच्या सावत्र आई जिजाबाईंचा मृत्यू. पाठोपाठ मुलगी इंदू, बाबांसाहेबांचा मोठा भाऊ आनंदराव व आनंदरावांचा मुलगा गंगाधरचा मृत्यू. १९२१ ला बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर व १९२६ मध्ये राजरत्नचा मृत्यू पाहिला. बाबासाहेबांच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून त्यांना कळविले नाही. परदेशात जाऊन ज्ञानसाधना करणाऱ्या बाबासाहेबांना मात्र रमाईने कधी आपल्या दु:खाची झळ पोहचू दिली नाही. पती परदेशात शिक्षणासाठी गेले, रमाई एकट्या पडल्या. घर चालविण्यासाठी तिने शेण गोवऱ्या, सरपणासाठी वणवण फिरल्या. पोयबावाडीतून दादर माहीम पर्यंत जात असत बॅरिस्टराची पत्नी शेण वेचते म्हणून लोकं नावे ठेवतील, या भितीने त्या पहाटे सूर्योदयापूर्वी व रात्री ८ नंतर गोवऱ्या थापायला वरळीला जात असंत, मुलांसाठी उपास करत असंत. बाबासाहेबांशिवाय दुसरा कूणीच पाठराखा नव्हता, त्यामुळेच त्यांना उपरोक्त उपक्रम करावाच लागला. पोटाची खडगी भरणे गरजेचं होतं. दोन वेळचं जेवन सुध्दा नशीबी नव्हतं. इतके कष्ट रमाईने सोसले. त्याची आच मुलांना सुध्दा लागू दिली नाही. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले होते, त्यावेळी रमाईची खूप वाताहत होत होती. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना रमाईचे हाल पहावले नाहीत. त्यांनी काही पैसे जमा केले. व ते पैसै रमाईला देऊ केले. तिने त्यांच्या भावनांचा आदर केला पण ते पैसे घेतले नाहीत. स्वाभिमानी पतीची ती स्वाभिमानी पत्नी जिद्दीने दु:खांशी अडचणींशी गरिबीशी भांडत होती, तरी पण त्या खचल्या नाहीत. मृत्युसत्र दु:ख, त्याग, समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता व प्रेरणास्थान म्हणजे रमाई !




**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

बाबासाहेब आणि रमाई दादरच्या राजगृह बंगल्यावर राहत होते. त्यावेळी एकदा अचानक बाबासाहेबांना परदेशी काही कामा निमित्त जायचे होते, पण रमाईला एकटी घरामध्ये कसे ठेवायचे म्हणून बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे मित्राकडे रमाईला पाठवले व काही दिवस तिकडेच राहायला सांगितले. वराळे काका धारवाड मध्ये लहान मुलांचे वस्तीगृह चालवत असत. त्या वस्तीगृहाच्या आवारात अनेक लहान मुले खेळायला येत असत. एक्दा अचानक दोन दिवस ती लहान मुले खेळायलाच आली नाही. म्हणून रमाईनी वराळे काकांना विचारले, दोन दिवस झाली ही मुले कुठे गेली आहेत खेळायला आवारात कां आली नाही. त्यावेळी वराळे म्हणाले, ती लहान मुले दोन दिवसापासून उपाशी आहेत. कारण वस्तीगृहाला जे अन्नधान्याचे अनुदान महिन्याला मिळायचे ते अजून मिळालेले नाही. ते मिळायला अजून तीन दिवस लागतील. अजून तीन दिवस ही मुले उपाशीच राहणार आहेत. त्यामुळे ती खेळायला बाहेर आली नाहीत. ते रमाईला कंठ दाटून सांगत असतांना, रमाई लगेच आपल्या खोली मध्ये गेल्या आणि रडत बसल्या त्यांनाही ते दु:ख सोसावेना. कपाटातला सोनं ठेवलेला डबा आणि आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून वराळे यांच्याकडे देऊन म्हणाल्या, तुम्ही ह्या बांगड्या आणि डबा ताबडतोब विकून किंवा गहान ठेवून ह्या लहान मुलांसाठी खाण्याच्या वस्तू घेऊन या. मी अजून तीन दिवस ही लहान मुले उपाशी नाही पाहू शकत. त्यावेळी वराळे त्या बांगड्या आणि डबा घेऊन जातात आणि लहान मुलांसाठी जेवणाच्या वस्तू घेऊन येतात, लहान मुले त्यावेळी पोटभरून जेवण झाल्यावर. खूप आनंदी असतात. हे पाहून रमाई देखील आनंदी झाल्या. त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला, मन गहिवरुन आलं. सगळी लहान मुले रमाबाई यांना रमाआई म्हणून नाचू बागडू लागली. आणि त्या क्षणा पासून रमाबाई ही माता रमाई झाली. आणि ती सगळ्यांची आई झाली. ख्यातनाम गायक, मिलिंद शिंदे म्हणतात, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, भुकेल्या मुलांची दशा पाहुनी, बांगड्या सोन्याच्या रमानं दिल्या काढुनी.. धन्य रमाई । धन्य रमाई ।

अस्पृश्यतेच्या अग्निदिव्यातून होरपळून निघालेले बाबासाहेब आता समाजाला अस्पृश्यतेच्या रोगातून मुक्त करण्यासाठी व त्यासाठी निष्णात डॉक्टर होण्यासाठी अपार कष्ट घेऊ लागले. अर्धपोटी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करु लागले. त्याच वेळी रमाईने आपल्या निष्ठेने, त्यागाने आणि कष्टाने स्वत:च्या संसाराचा गाडा हाकलून बाबासाहेबांना ध्येय गाठण्यासाठी मदत करत होती. डॉ. बाबासाहेब परदेशातून शिक्षण घेऊन मुंबईला आले असता, त्यांच्या स्वागताला सर्व आंबेडकरी समाज व त्यांना मानणारा चाहता वर्ग मुंबई बंदरात आला. साहेबांचे स्वागत बघण्यासाठी माईला सुध्दा जायचे होते. परंतू, नेसण्यासाठी चांगली साडी नव्हती तेव्हा त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या सत्कारप्रसंगी दिलेला भरजरी फेटा नेसून बाबासाहेबांच्या स्वागतासाठी आल्या. ते बोटीतून उतरताच जनासागर उफाळून आला, त्यांच्या जयजयकाराने बंदर दुमदुमून गेले. अनेकजण त्यांना भेटत होते, हस्तांदोलन करीत होते. पण रमाई मात्र लांब कोपऱ्यात उभी दिसताच, बाबासाहेबांची नजर त्यांच्या रामूवर गेली, ते जवळ गेले. त्यांनी विचारले, रामू ! तू लांब का उभी राहीलीस' ? रमाई म्हणाली, तुम्हाला भेटण्यासाठी सारा समाज आतूर झाला असतांना मी तुम्हाला आधी भेटणे योग्य नव्हते, म्हणुन तर मी अशी लांब उभी आहे, शेवटी, मी तर तूमची पत्नीच आहे. मी तुम्हांस कधीही भेटू शकते. रमाईंनी अठ्ठावीस वर्षे बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्ययनात व्यत्यय येऊ नये म्हणून त्या राजगृहाच्या प्रवेशद्वारावर तासनतास बसून राहायच्या. बाबासाहेबांना कोणी भेटायला आल्यावार त्यांच्याशी तितक्याच अदबीने वागत, साहेब पुस्तकाच्या कोंडाळ्यात आहेत, नंतर भेटा. असे म्हणत. आलेल्याची रवानगी करताना त्याचे नाव, गाव, कामाचे स्वरूप, पुन्हा कधी येणार आहात, हे सारे एका नोंदवहीत टिपण्यास सांगत, इतकी ती त्यांना जोपासत होती. हळवं मन मितभाषी अत्यंत स्वाभिमानी अशा रमाई होत्या. साहेबांसाठी जिवाचं रान करणारी रमाई त्यांना कसलीही इजा होणार नाही यासाठी धडपडणारी रमाई ! रमाईचं शरीर काबाड कष्टाने पोखरून खंगुन गेलं होतं, रमाईचा आजार बळावला होता. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. पण अंगात त्राण नसल्यामुळे त्या बोलू शकत नव्हत्या. बाबासाहेबांच्या आग्रहामुळे रमाई थोडी कॉफी किंवा मोसंबीचा रस पीत असत. त्यांचा आजार काही केल्या बरा होत नव्हता. बाबासाहेबांना दुःख अनावर होत होतं. अस्वस्थपणा जाणवत होता, ते काहीच बोलू शकत नव्हते, निमूटपणे रमाई कडे बघत होते. दादरच्या राजगृहासमोर लाखो लोक जमले होते. यशवंताबरोबर दीनांना पोरका करणारा दिवस उजाडला. २७ मे १९३५ रोजी सकाळी ९ वाजता रमाईची प्राण ज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाला. कोट्यवधी रंजल्या गांजल्याची रमाई माता त्यांना अंतरली होती. दुपारी २ वाजता रमाईची प्रेतयात्रा वरळी स्मशानाकडे निघाली. आम्हा दुरावली मायेची सावुली. निर्वाण पावली आमची रमाई माऊली. पहाडासारखे बाबासाहेब ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षांच्या संसारात प्रेमाने व धैर्याने भक्कम सोबत देणाऱ्या रमाबाई मध्येच अचानक सोडून न परतीच्या वाटेने कायमच्या दूर निघून गेल्या त्यामुळे बाबासाहेब आपल्या संसारात अगदी एकाकी पडले. बाबासाहेब आंबेडकरांचे रमाबाईवर निस्सीम प्रेम होते. तिचे कष्ट पाहून त्यांचे मन तुटायचे. त्यांनी आपल्या रामूला पाठवलेल्या पत्रात त्यांच्या या भावना प्रतिबिंबित व्हायच्या. 'थॉट्स ऑन पाकिस्तान' हा आपला ग्रंथ बाबासाहेबांनी आपल्या 'प्रिय रामू' ला अर्पण केला. अर्पणपत्रिकेत बाबासाहेबांनी लिहिले आहे की, ''तिच्या हृदयाचा चांगुलपणा, मनाची कुलीनता आणि शीलाच्या पावित्र्यासह तिचे शालीन मनोधैर्यनी माझ्याबरोबर दु:ख सोसण्याची तिची तयारी अशा दिवसांत तिने मला दाखविली- जेव्हा मी नशिबाने लादलेला मित्रविरहित काळ चिंतेसह कंठीत होतो. या बिकट परिस्थितीत साथ देणाऱ्या रामूच्या आठवणींत कोरलेले हे प्रतीक...'' आपल्या पत्नीबद्दलच्या भावना बाबासाहेबांच्या या अर्पणपत्रिकेतून व्यक्त झाल्या आहेत. आजच्या दिनी माता करुणामूर्ती रमाईच्या ८९ व्या पुण्यतिथी निमीत्त विनम्र अभिवादन !

# डान्स पे चान्स मार लें

संध्याकाळी 'गाला डिनर' आणि सोबतीला 'बेली डान्स', म्हणजे जणुकाही आंधळा मागतो एक डोळा, देव देतो दोन डोळे! खरेतर बॅले डान्स आणि बेली डान्स दोन्ही वेगवेगळे आहे. बॅले डान्सचा उगम पंधराव्या शतकात इटलीतून आणि प्रसार फ्रान्स, रशिया युरोपा पर्यंत. तर बेली डान्स मध्यपूर्वेतला, इजिप्त, तुर्की अरबी प्रदेशात व्याप्ती. बॅलेत नाच, संगीत, नेपथ्य आणि नाट्याचा समावेश तर बेली डान्समध्ये वाद्यांवर थिरकणे. बॅलेत हात, पाय आणि बॉडी लाईनिंग तर बेली डान्समध्ये निव्वळ हिप्स, रिब केज, धड ( शरिराचा मध्यभाग) यांचा वापर होतो. अर्थातच दोन्ही डान्स विशिष्ट कला असून नागीण डान्स एवढे सोप्प नक्कीच नाही. बॅलेत स्ट्रेस फ्रॅक्चर, ॲचिलीज टेंडेनायटीस, स्प्रेन्ड ॲंकल्स आदी शारिरीक दुखापती संभवतात; तर या डान्समुळे चांगलाच व्यायाम घडतो. बेली डान्सबाबत आणखी सांगायचं झालं तर यांत देश, विभागानुसार प्रकार आढळतात. पोट, कंबर आणि नितंब हे चरबी साठवण्याचे राष्ट्रीय कोठार नव्हे; तर बेली डान्स करीता उपयुक्त अंग आहेत. यात लयबद्धतेने हिप्स, रिब्स केजची वाद्य,संगीतावर लवचिक आकर्षक हालचाल केली जाते. हिप्स लिफ्ट करणे, ड्रॅाप करणे, ट्विस्ट करणे, रॉक करणे यासोबच खांद्यांचे संतुलन राखणे महत्वपूर्ण मानले जाते. यांत ॲब्डॉमिनल मसल्सचे नियंत्रण तेवढेच महत्वाचे आहे. हिप्स द्वारे व्हर्टीकल, हॉरिझॉंटल आठच्या आकड्यांची करामत दाखवणे असो की हवेत वर्तुळे काढून दाखवणे असो, जबरदस्त मेहनत आणि सराव लागतो. वारंवार हिप्स मुव्हमेंटमुळे पाय आणि पाठीच्या लांब मसल्स ताणल्या जातात. याशिवाय बेली डान्समध्ये हिप्स, रिब्स केजला सतत थिरकवत ठेवणे, स्टेप्स घेणे, टर्न होणे आणि गिरक्या घेणे इ. बाबी येतात. (गिरक्या म्हणजे आजकाल साक्षगंध, लग्नात नवरी मुलगी नव-या मुलाचा हात पकडून स्वतः भोवती गरगर फिरते, वेटोळे घेते ती कला) यांत आणखी कलाकारी म्हणजे फ्रंट बेन्ड, बॅक बेन्ड, हेड टॉस समाविष्ट आहेत. या सगळयांचं सर्वोत्तम उदाहरण म्हणजे कोलंबीयन गायिका शकीरा. तिचे गाणे व्हेनेव्हर, व्हेरेव्हर आणि हिप्स डोन्ट लाय प्रसिद्ध आहेत. शकीरा नंतर आणखी एक नांव घ्यायचे झाल्यास 'रिहाना'चे घेता येईल. आता मूळ विषयाकडे वळू. तर या मेजवानीसाठी सर्वात महत्वाची बाब म्हणजे सर्वांसाठी ड्रेस कोड होता. पुरूषांसाठी कोट, टाय आणि ह्या सुचना हॉलच्या दर्शनी भागात स्पष्ट लावल्या होत्या. भलेही कोणी फॉर्मल ड्रेसमध्ये आले, तरी प्रवेश नाकारला जात नव्हता. परंतु ते सभ्यपणाचे लक्षण मानले जात नाही. काही मुली, स्त्रिया तर पारंपारीक वेषात, स्कार्फ बांधून आल्या होत्या. थोडक्यात काय तर पाहुण्यांकडून डिसेन्ट ड्रेस आणि सभ्यतेची अपेक्षा



आयोजकांना असते. इथले वातावरण मंद धुंद प्रकाशात पण सुटसुटीत, निटनेटके आणि बसण्याची व्यवस्था प्रशस्तपणे केलेली असते. वाद्य संगीताने वातावरण निर्मिती केली जाते, खाद्य व पेय वितरीत केले जाते आणि हॉल भरताच बेली डान्सला सुरूवात होते. यांत सात नर्तकी भाग घेतात, प्रारंभ डान्सपे चान्स मारले या सुपरहीट गाण्याने होते. नर्तकींचे वर्णन काय ते करावे, त्या सप्ततारका साक्षात रंभा उर्वशी! जणूकाही कोमल काया की मोहमाया पुनव चांदणं न्हाली, सोन्यात सजले रूप्यात भिजले रत्नप्रभा तनू ल्याली. ही नटली थटली जशी उमटली चांदणी रंगमहाली, अप्सरा आली इंद्रपुरीतून खाली उतरली. काय ती दिलफेक अदा काय तो जलवा, रशियन सुंदरी म्हणजे अवर्णनीय, 'चाल है की मौज की रवानी जुल्फ है की रात की कहानी, होंठ है की आईने कँवल के, ऑख है की मयकदों की राणी'. थोडक्यात काय तर रुपाची खाण नजरेत बाण! उत्तम पददालित्य, सहजसुलभ हालचाली, एक्सप्रेस संगीतावर तुफानी डान्स, एकदम डेडली कॉम्बिनेशन, एकदम झकास, बोले तो बेली डान्स नंबर वन. त्यातही टेबल भोवती येऊन जेंव्हा त्या थिरकतात, माधुर्यपूर्ण उंच आवाजात गात ललकारी देतात तेंव्हा तो स्वर थेट काळजात घुसतो, आपण इंद्रसभेत असल्याचा भास होतो. टेबलवरील खाण्याकडे कोणाचेही लक्ष नसते. जो तो हा नेत्रदिपक सोहळा डोळ्यात सामावून घेण्याच्या प्रयत्नात असतो. आपल्याला दोनपेक्षा जास्त डोळे असते; तर किती बरे झाले असते असा वेडा विचार मनाला स्पर्शून जातो. फारतर पंधरा वीस मिनिटांचा हा थरार असतो, पण अवघं वातावरण मंत्रमुग्ध होऊन जाते.

**भाग ०६**

# अंबाजोगाई शहरातील स्वच्छता, रस्ते व पाणी पुरवठा नियमित करा-राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील विस्कळीत झालेला पाणी पुरवठा सुरळीत करणे तथा शहरात अतिशय संथ गतीने होत असलेली रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करून नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाला आलेली मरगळ दुर करून शहरातील स्वच्छतेचा प्रश्न तात्काळ मिटवावा व होणारी नागरिकांची गैरसोय टाळावी या मागणीचे निवेदन तहसीलदार तथा मुख्य प्रशासक नगर परिषद अंबाजोगाई यांना राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने आज देण्यात आले.

मागील एक ते दोन महिन्यांपासून अंबाजोगाई शहराला होणार पाणी पुरवठा पुर्णपणे विस्कळीत झाला आहे. पाणी पुरवठा विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे याचा नाहक त्रास अंबाजोगाई शहर वासीयांना होत आहे.अनेक सामान्य नागरिकांना पाणी विकत घेण्याची पाळी येऊ लागली आहे.यामुळे सामान्य नागरिकांना विनाकारण आर्थीक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तेव्हा तहसीलदार , प्रशासक नगर परिषद अंबाजोगाई यांनी याकडे जातीने लक्ष घालून अंबाजोगाई करांची पाण्याविना होणारी फरफट थांबवावी अशी मागणी निवेदनाद्वारे राजकिशोर मोदी यांनी केली आहे.त्याचबरोबर अंबाजोगाई शहरात मागील काही महिन्यांपासून रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. सुरू असलेली कामे अतिशय संथ गतीने चालू आहेत. या कासव गतीच्या कामामुळे देखिल नागरिक त्रस्त झाले आहेत. तेव्हा शहरात संथ गतीने होत असलेली रस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी संबंधित एजन्सीला आदेशीत करावे. तसेच नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाचे देखील शहर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे. यामुळे शहरात ठिकठिकाणी घाण दिसून येत आहे. यावरही संबंधित विभागास तात्काळ स्वच्छते विषयी आदेशीत करून अंबाजोगाई वासीयांच्या मूलभूत प्रश्नांकडे विनाविलंब लक्ष द्यावे अशी मागणी या निवेदनाद्वारे राजकिशोर मोदी यांनी समस्त अंबाजोगाई वासीयांच्या वतीने करण्यात येत आहे. तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनावर राजकिशोर मोदी यांच्यासह माजी उप नगराध्यक्ष मनोज लखेरा, माजी नगरसेवक महादेव आदमाणे, कचरूलाल सारडा, खालेद चाउस, सुनील वाघाळकर दिनेश भराडीया, सुनील व्यवहारे,अमोल लोमटे, धम्मा सरवदे, सुधाकर टेकाळे, गोविंद पोतंगले, उज्जेन बनसोडे, अकबर पठाण, तौसिफ सिद्दीकी, शाकेर काझी, सुभाष कोळी, विष्णू पांचाळ,सचिन जाधव,दत्ता सरवदे, वजीर शेख, सय्यद ताहेर,विशाल पोटभरे, कैलास कांबळे,भारत जोगदंड, बालाजी जोगदंड, सुशील जोशी, जमादार पठाण, अरबाज पठाण, खलील जाफरी, शरद काळे, जावेद शेख, शाहिद शेख, रफिक गवळी, मुनिर शाह, अस्लम शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# गांजा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी मागितली परवानगी;जिंतूर तहसीलदारांना निवेदन

**कौसडी । प्रतिनिधी**




जिंतूर तालुक्यातील बोरी व गोंधळा येथील दोन शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन गांजा लागवडी साठी परवानगी मागितली आहे.

देशात शेतकरी आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत असून शेती म्हणजे हातभट्ट्यांचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे शेतीकडे नवीन पिढी दुर्लक्ष करताना दिसत आहे. असे असले तरी शासन तरुणांना रोजगार देण्यासाठी असमर्थ ठरत असल्यामुळे प्रचंड बेरोजगारी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मुलाला शेती शिवाय पर्याय नाही कृषीप्रधान देशात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या परंतु यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. शिवाय शेतकरी आत्महत्याचे कारण समजून देखील शेतमालाच्या रास्त भावाकडे सरकारने दुर्लक्ष केले आहेत. मागील दहा वर्षात शेतमालाचा भाव अजिबात वाढलेला नाही. परंतु शेतीसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली असल्यामुळे उत्पादन खर्च दुप्पट तिप्पट झाला आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे

शेतमालाला रास्त भाव देणे शक्य नसेल आणि शेतीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचे खतांचे बियाण्यांचे दर कमी करणे शक्य नसेल तर शासनाने शेतकऱ्यांना गांजा लावण्याची परवानगी द्यावी असे दिलेल्या निवेदनात उल्लेख केलेला आहे. या निवेदनावर हनुमान आमले, दगडूबा वजीर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बुध्दपोर्णिमा निमित्त मानवत येथे शांतीचा संदेश देत भव्य धम्मरॅली

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत येथे भारतीय बौद्ध महासभा मानवत तालुका शाखेच्या वतीने बौध्द पौर्णिमे निमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची मानवत शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. शहरातील आंबेडकर नगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याला पुष्पहार अर्पन करून संपूर्ण मानवत शहरातील मेन रोड वरून भव्य रॅली काढण्यात आली. तर बौध्द पोर्णिमे निमित्त काढण्यात आलेल्या भव्य रॅलीचा समारोप मानवत शहरातील राजर्षी शाहू नगरा मधिल नालंदा बौद्ध विहार येथे समारोप करण्यात आला.

यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे



पूजन करून यावेळी उपस्थित जनसमुदाय यांना वंचित बहुजन आघाडीचे नेते मा. धम्मपालजी सोनटक्के, मानवत तालूका भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष मा. बालकिशन धबडगे , मानवत तालुका सरचिटणीस रामेश्वरजी एडके, मानवत तालुका उपाध्यक्ष उपसंत कांबळे यांनी यावेळी उपस्थित जन समूदाय व समाज बांधवांना मार्गदर्शन केले. तर यावेळी श्रामणेर संघाचे संघनायक भन्ते आनंद यांच्या धम्मदेशनाने व शरणातय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाला मानवत तालुक्यातील हाजारो बौध्द उपासक महिला , व पुरुष या वेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानवत तालुका कोषाध्यक्ष शिवाजीराव लाटे मानवत तालुका संघटक दतरावजी तूपसमुद्रे व बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांच्यासह महिला पुरुष यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# संगमनेरच्या प्रवरा नदीत बुडून दोघांचा मृत्यू ;उन्हाळी आवर्तनाने केला घात

**संगमनेर । प्रतिनिधी**

बुधवारी अकोले तालुक्यातील सुगांव मध्ये दोघांचा बुडून मृत्यू झाल्यानंतर गुरुवारी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या तिघांसह चौघे बुडाल्याची धक्कादायक घटना ताजी असताना आता संगमनेरातूनहीअत्यंत धक्कादायक वृत्त हाती आले आहे. आज सायंकाळी पाचच्या सुमारास गंगामाई परिसरातील प्रवरानदीपात्रात आंघोळ करणार्या दोघा सतरा वर्षीय मुलांचा वाळू तस्करांनी पोखरलेल्या भल्या मोठ्या खड्ड्यात बुडून मृत्यू झाला आहे. आदित्य रामनाथ मोरे व श्रीपाद सुरेश काळे अशी मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत. या दुर्घटनेत बळी गेलेल्या दोन्ही मुलांचे मृतदेह हाती लागले असून संगमनेरात शोककळा पसरली आहे.

याबाबत हाती आलेल्या प्राथमिक माहितीनुसार सदरची घटना आज (ता.२४) सायंकाळी




पाचच्या सुमारास गर्दीने ओसंडलेल्या गंगामाई घाटावर घडली. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने मुलांना शालेय सुट्ट्या आहेत. त्यातच गुरुवारी सायंकाळपर्यंत निळवंडे धरणातून आवर्तन सुरु असल्याने गेल्या २० दिवसांपासून प्रवरामाई वाहती आहे. त्यामुळे दररोज संध्याकाळी संगमनेरकर नागरीक आपल्या मुलांसह नदीकाठी फिरण्यासाठी व आंघोळीसाठी गर्दी करतात.आज सायंकाळीही नदीवर मोठ्या प्रमाणात गर्दी होती. अनेक पालक आपल्या लहान मुलांसमवेत नदीपात्रात आंघोळीचा आनंद घेत होते. त्याचवेळी गंगामाई परिसरात घाटालगत आंघोळ करणारे आदित्य रामनाथ मोरे (वय १७, रा.घुलेवाडी) व श्रीपाद सुरेश काळे (वय १७, रा.कोळवाडे) हे दोघे तरुण पोहोत असताना अवघ्या काही अंतर पूर्वेकडे गेले असतात्यांना अचानक मोठा खड्डा जाणवला, दुर्दैवाने त्यातून सावरण्यापूर्वीच एकापाठोपाठ दोघेही त्या खड्ड्यात बुडाले. यावेळी नदीपात्रात असलेल्या काहींनी त्यांना वाचवण्याचाही प्रयत्न केला, मात्र त्यात अपयश आले. घटनेनंतर अर्धातासाने बुडालेल्या दोन्ही मुलांचे मृतदेह तरंगत बाहेर आल्यानंतर अन्य लोकांनी ते बाहेर काढले.गेल्याकाही वर्षात वाळू उचलण्यासाठी सतत विरोध करुनही रिक्षा व बैलगाडीद्वारे वाळूचोरी करणार्यांनी गंगामाई, हनुमान टेकडी, केशवतीर्थ व महादेव मंदिराच्या परिसरातून सातत्याने प्रचंड वाळू उपसा केला आहे. त्याचा परिणाम नदीपात्रात प्रचंड मोठे खड्डे आणि कपारी निर्माण झाल्याने नवख्या पोहणार्यांसाठी संगमनेरचे नदीपात्र अत्यंत धोकादायक ठरले आहे.

# आबासाहेब टरपले यांच्य हस्ते जी.के प्रोफेशनल हेअर सलुन या शाखेचे उद्घाटन



**सेलू । रोहित झोल**

दि.२२ वार गुरुवार रोजी मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन सेलू तालुका सचिव मा. श्री विठ्ठलराव काळे साहेब यांच्या जी.के प्रोफेशनल हेअर सलुन या नवीन शाखेचे उद्धाटन मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष आबासाहेब टरपले यांच्य हस्ते करण्यात आले नक्षत्रवाडी, हिंदुस्तान आवास छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. यावेळी उपस्थित संभाजीनगर येथील नगरसेवक, विठ्ठलराव काळे,आबासाहेब टरपले , संस्थापक अध्यक्ष, मराठवाडा सामाजिक फाऊंडेशन, प्रदेश उपाध्यक्ष डी.एस. कातारे पाटील, भीमराव कारके,तसेच छत्रपती संभाजीनगर येथील व नक्षत्रवाडी येथील मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईक उपस्थित मोठ्या संख्येने होते.

# एम.एस.क्लासेसच्या वतीने,क्लासेस मधील बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

## एम.एस.क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविण्याचे केंद्र-प्रा.श्रीनिवास काकडे

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी सारख्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांमध्ये उच्च गुणवत्ता निर्माण करणारे एम. एस.कोचिंग क्लासेस म्हणजे विद्यार्थी घडविणारे केंद्र आहे असे मत प्रा.श्रीनिवास काकडे यांनी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी व्यक्त केले.

सविस्तर वृत्त असे की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या फेब्रुवारी-मार्च २०२४ एच.एस.सी.बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे यामध्ये एम. एस.कोचिंग क्लासेस वडवणीच्या विद्यार्थ्यांनी बायोलॉजी. फिजिक्स मॅथ आणि केमिस्ट्री या विषयांमध्ये १०० पैकी ९९ पर्यंत गुण मिळवून घवघवीत यश मिळवले ९५ ते ९९ या दरम्यान गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते एम.एस.कोचिंग क्लासेसची विद्यार्थिनी कु. मुंडे लक्ष्मी मॅथ विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवले .बायोलॉजी याविषयात १०० पैकी ९७ गुण मिळवले तर चि.अविनाश मस्के मॅथ ९८ तसेच कु.सवालके प्रीती ९६ तर कु. सावंत भाग्यश्री ९६ व कु.यादव श्याम बाला बायलॉजी ९५ तसेच चि. विवेक होंडे बायलॉजी ९४ असे भरघोस गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या विद्यार्थ्यांना क्लासेसचे संचालक प्रा. सावंत सर,प्रा.गवारे सर,प्रा. मरळकर सर,प्रा.मुंडे सर यांचे मार्गदर्शन लाभले होते या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रा.श्रीनिवास काकडे,बागडे सर आणि इतर मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच सत्कार कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले प्रा.श्रीनिवास काकडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,या क्लासेसने अत्यंत कमी कालावधीमध्ये आपली गुणवत्ता सिद्ध करून दाखवली आहे या जीवघेण्या स्पर्धेमध्ये वडवणी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा योग्य मार्गदर्शन मिळाले तर मागे राहत नाही इथून पुढे विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना इतरत्र कोठेही क्लासेस ला जायची गरज नसून लातूर, औरंगाबाद,नांदेड सारखे उच्च गुणवत्तेचे शिक्षण वडवणी मध्ये मिळत असल्याने समाधान व्यक्त करून शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मरळकर सर यांनी केले तर आभार गवारे सर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.मुंडे सर,सावंत सर व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# एकाच गावात आढळले डेंग्यूचे १५ रुग्ण संशयित रुग्णांची शोध मोहीम सुरूच

**गडचिरोली | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील कढोली ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या रामपूर या गावात डेंग्यूचा उद्रेक झाला असून एकाच गावात १५ रुग्ण आढळून आल्याने एकच खडबड उडाली आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयातील अतिदक्षता विभागात एकूण ०४ रुग्ण आणि चामोर्शी तालुक्यातील आष्टी ग्रामीण रुग्णालय येथे एकूण ११ रुग्ण उपचार घेत आहेत.पावसाळ्यापूर्वीच डेंग्यूने डोके वर काढल्याने आरोग्य विभागाच्या साथरोग नियंत्रण उपाययोजना कुचकामी ठरत असल्याचे बोलले जात आहे. रामपूर येथे २२ मे रोजी डेंग्यूचे ३ रुग्ण आढळून आले होते. त्यानंतर टप्प्याटप्प्याने रुग्णसंख्येत वाढ झाली. २६ मे अखेरपर्यंत १५ रुग्ण निष्पन्न झाले आहेत. यातील ११ रुग्णांवर आष्टी ग्रामीण रुग्णालय, तर ०४ रुग्णांवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर गावात अजूनही संशयित रुग्णांची शोध मोहीम आरोग्य विभागाकडून केली जात आहे.यापूर्वीच दोन रुग्णांची प्लेटलेट्स कमी झाल्याने त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले



आहे.तर सध्या ११ रुग्णावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. आणखी ०३ संशयित रुग्ण आष्टी येथे पाठविण्यात आल्याची माहिती आष्टीचे वैद्यकीय अधीक्षक ऋषिकेश बर्डे यांनी दिली आहे.दरम्यान जिल्ह्यात पर्जन्यमान अधिक असते. त्यामुळे दरवर्षी डेंग्यू मलेरिया सारख्या आजारांचा धोका अधिक बळावतो. जलजन्य आजारांचीही शक्यता असते, या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाकडून योग्य त्या उपाययोजना राबविणे अपेक्षित आहे. मात्र, पावसाळा सुरू होण्याआधीच डेंग्यूने डोके वर काढल्याने या उपाययोजनाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**खा.अशोक नेते यांनी रुग्णालयाला दिली भेट**

दरम्यान ही बातमी कळताच गडचिरोली–चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार अशोक नेते यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे भेट देऊन रुग्णांची आस्थेने विचारपूस करत रुग्णालयातील सोयी सुविधांचा आढावा घेत वैद्यकीय अधिकाऱ्यांना रुग्णांची योग्य काळजी घेऊन उपचार करण्याचे निर्देश दिले.

रामपूर येथील डेंग्यूचे ४ रुग्ण जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असून आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात देखील काही रुग्णांवर उपचार सुरू आहेत.त्या ठिकाणी किती रुग्ण आहे याचा नेमकं आकडा माहीत नाही.गावात फोगिंग केले,टेस्टिंग सुरू आहे.ज्यांना लक्षणे आढळत आहेत त्यांची तपासणी करण्यात येत आहे.

**–डॉ.प्रताप शिंदे,जिल्हा आरोग्य अधिकारी,गडचिरोली.**

# गांजा लागवडीसाठी शेतकऱ्यांनी मागितली परवानगी;जिंतूर तहसीलदारांना निवेदन

**कौसडी | प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील बोरी व गोंधळा येथील दोन शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन गांजा लागवडी साठी परवानगी मागितली आहे.

देशात शेतकरी आत्महत्येचा आकडा दिवसेंदिवस वाढत असून शेती म्हणजे हातभट्ट्यांचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे शेतीकडे नवीन पिढी दुर्लक्ष करताना दिसत आहे. असे असले तरी शासन तरुणांना रोजगार देण्यासाठी असमर्थ ठरत असल्यामुळे प्रचंड बेरोजगारी वाढली आहे. शेतकऱ्यांच्या मुलाला शेती शिवाय पर्याय नाही कृषीप्रधान देशात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या परंतु यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. शिवाय शेतकरी आत्महत्याचे कारण समजून देखील




शेतमालाच्या रास्त भावाकडे सरकारने दुर्लक्ष केले आहेत. मागील दहा वर्षात शेतमालाचा भाव अजिबात वाढलेला नाही. परंतु शेतीसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली असल्यामुळे उत्पादन खर्च दुप्पट तिप्पट झाला आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे

शेतमालाला रास्त भाव देणे शक्य नसेल आणि शेतीसाठी लागणाऱ्या साधनसामग्रीचे खतांचे बियाण्यांचे दर कमी करणे शक्य नसेल तर शासनाने शेतकऱ्यांना गांजा लावण्याची परवानगी द्यावी असे दिलेल्या निवेदनात उल्लेख केलेला आहे. या निवेदनावर हनुमान आमले, दगडूबा वजीर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बुध्दपोर्णिमा निमित्त मानवत येथे शांतीचा संदेश देत भव्य धम्मरॅली

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत येथे भारतीय बौद्ध महासभा मानवत तालुका शाखेच्या वतीने बौध्द पौर्णिमे निमित्त तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेची मानवत शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. शहरातील आंबेडकर नगर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य पुतळ्याला पुष्पहार अर्पन करून संपूर्ण मानवत शहरातील मेन रोड वरून भव्य रॅली काढण्यात आली. तर बौध्द पोर्णिमे निमित्त काढण्यात आलेल्या भव्य रॅलीचा समारोप मानवत शहरातील राजर्षी शाहू नगरा मधिल नालंदा बौद्ध विहार येथे समारोप करण्यात आला.

यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे



पूजन करून यावेळी उपस्थित जनसमुदाय यांना वंचित बहुजन आघाडीचे नेते मा. धम्मपालजी सोनटक्के, मानवत तालूका भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष मा. बालकिशन धबडगे , मानवत तालुका सरचिटणीस रामेश्वरजी एडके, मानवत तालुका उपाध्यक्ष उपसंत कांबळे यांनी यावेळी उपस्थित जन समूदाय व समाज बांधवांना मार्गदर्शन केले. तर यावेळी श्रामणेर संघाचे संघनायक भन्ते आनंद यांच्या धम्मदेशनाने व शरणातय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी कार्यक्रमाला मानवत तालुक्यातील हाजारो बौध्द उपासक महिला , व पुरुष या वेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानवत तालुका कोषाध्यक्ष शिवाजीराव लाटे मानवत तालुका संघटक दतरावजी तूपसमुद्रे व बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांच्यासह महिला पुरुष यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# शंकरपुरात चक्रीवादळाचा तडाका;अनेक झाडे पडली

**चिमूर | प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर परिसरात दिनांक २६ मे ला सायं सायंकाळी चार वाजताच्या सुमारास जोरदार चक्रीवादळामुळे अनेक घराच्या टीना छप्पर तसेच झाडांची मोडतोड झाल्या मुळे बरीचशी नुकसान झाली आहे. या चक्रीवादळामुळे जवराबोळी येथील अनेक घराच्या टीना उडल्या तर जवराबोळी शंकरपूर रोडवर झाडे पडल्यामुळे रस्त्यावरील वर्दळ बंद पडली. तसेच शंकरपूर येथे सुद्धा आंब्याचे झाडे तसेच जांभळी चे झाडे पडल्याने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले तसेच प्राथमिक स्वास्थ्य केंद्र शंकरपूर येथे सुद्धा झाडाची बऱ्याच प्रमाणात मोडतोड झाली. या चक्रीवादळामुळे शंकरपूर तसेच परिसरातील विद्युत तारा तुटल्याने परिसरातील विद्युत पुरवठा पूर्णपणे बंद पडला. त्यामुळे शंकरपूर तसेच परिसरातील गावातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले.



# चिंताजनक मराठीत २४ हजार मुले नापास!

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

बारावी परीक्षेतील मराठीसह हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या मुख्य भाषा विषयांमध्ये राज्यातील हजारो विद्यार्थ्यांची दांडी गुल झाली आहे. विद्यार्थ्यांना या हिंदुस्थानी भाषांमध्ये गुण मिळविणे अवघड वाटत असून त्यापेक्षा फॉरेन लंग्वेज विद्यार्थ्यांना अधिक गुण मिळवून देत असल्याचे यंदाच्या निकालातून समोर आले आहे. राज्यातील सर्वाधिक १४ लाख ८९ हजार ९२४ विद्यार्थ्यांनी इंग्रजीची परीक्षा दिली. त्यापैकी १३ लाख ९९ हजार ८९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून भाषा विषयांमध्ये सर्वात कमी निकाल ९६.९६ % टक्के इंग्रजीचा लागला आहे. हिंदी विषयाचा निकाल ९६.०४ % टक्के असून ३ लाख ४७ हजार ८०९ विद्यार्थी पास झाले आहेत. मायमराठीचा निकाल ९६.९६ % टक्के आहे. मराठीत ८ लाख १४ हजार ४१५ विद्यार्थ्यांपैकी ७ लाख ८९ हजार ६७१ जण पास झाले आहेत, तर उर्दू भाषेचा निकाल ९६.७४ % टक्के लागला आहे. ५ भाषा विषयांचा निकाल १०० % टक्के लागला आहे. यात मल्याळम, तेलगू, पंजाबी, रशियन, स्पॅनिश या विषयांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना हे विषय सोप्पे विद्यार्थ्यांना सायकोलॉजी, इकॉनॉमिक्स, सोशोलॉजीपेक्ष फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी विषय सोप्पे ठरले आहे.

# प्रत्येकाने करावा वंचितांच्या सेवेचा संकल्प पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचे आवाहन

## रोटरी क्लब, रतन न्यूजपेपर एजन्सीतर्फे सायकल वितरण

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

वंचितांची सेवा करणे हे ईश्वरीय कार्य आहे आणि तीच आपली संस्कृती आहे. त्यामुळे सेवेतून वंचितांचे दुःख दूर करण्याचा संकल्प प्रत्येकाने करायला हवा, असे आवाहन राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर आणि रतन न्यूजपेपर एजन्सी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायकल वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर आणि रतन न्यूजपेपर एजन्सीच्या संयुक्त विद्यमाने उड्डाण प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात वृतपत्र वितरकांना ६५ सायकलचे वितरण करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरचे अध्यक्ष अनुप यादव, डॉ. विजय आईंचवार, रतन न्यूजपेपर एजन्सीचे जितेंद्र चोरडिया, एमआयडीसीचे अध्यक्ष मधुसुदन रुंगठा, रोटरी क्लबचे सचिव कुंजबिहारी परमार, डॉ. गोपाल मुंधडा, डॉ. अशोक वासलवार, अरुण तिखे, रविंद्र जुनारकर, नवीन चोरडिया, सार्वजनिक संस्थांचे पदाधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती. ना. सुधीर मुनगंटीवार यांनी




सामाजिक उपक्रमाचे कौतुक करताना आयोजकांचे अभिनंदनही केले. ना. श्री. मुनगंटीवार म्हणाले, 'रोटरी क्लब आणि रतन न्यूजपेपर एजन्सीच्या वतीने एक उत्तम सामाजिक कार्य होत आहे. त्यामुळे ज्यांना आज सायकल मिळाली आहे त्यांचेही विशेष अभिनंदन करतो आणि त्यांना आयुष्यभर भरभरून आनंद मिळावा, अशी माता महाकालीकडे प्रार्थना करतो. चंद्रपूरमध्ये हिऱ्यांची कमतरता नाही. रोटरी क्लबने १०० सायकल देण्याचा निर्णय घेतला त्यावेळी रतन न्यूजपेपर एजन्सीने त्यात शंभर सायकलची भर घातली, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. स्वतः कमावून स्वतःसाठी खर्च करणे ही प्रकृती, स्वतः न कमावता दुसऱ्याच्या कमाईवर नजर ठेवणे ही विकृती आणि स्वतः कमावून त्यातला काही भाग वंचितांसाठी खर्च करणे ही संस्कृती आहे, असे म्हटले जाते. ही संस्कृती चोरडिया परिवाराने दाखविली. हा समाजापुढे एक मोठा आदर्श आहे.' या समाजात ज्याला वंचितांची सेवा करण्याची संधी मिळेल त्याने या संधीचा लाभ घ्यायला हवा. 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे' या कविवर्य विंदा करंदीकर यांच्या ओळींची प्रचिती देण्याचे काम रोटरी क्लब आणि रतन न्यूजपेपर एजन्सीने केले आहे. समाजाला यथाशक्ती देण्याचे सत्कार्य त्यांच्या हातून झाले आहे, या शब्दांत ना. मुनगंटीवार यांनी आयोजक संस्थांचा गौरव केला. ४० वर्षापासून पेपर वितरणाचे काम करीत असलेले मारोती धाबेकर, वसंता चरलावार, भूषण शिरसगावकर यांचा सत्कार करण्यात आला. तर राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या श्राव्य घोडमारे, सेजल भगतकर, लक्ष घोडमारे व अनन्या देवईकर यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ चंद्रपूर व रतन न्यूज पेपर एजन्सी तर्फे ना.सुधीर मुनगंटीवार यांना तिरुपती बालाजीची मूर्ती भेट देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सिमला गाजरलावार यांनी केले तर आभार कुंजबिहारी परमार यांनी मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .